पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १३/०४/२०१९

## जखमी पोलीस जवानांच्या शौर्याची मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुन प्रशंसा

गडचिरोली पोलीस दलाने सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०१९ ची मतदान प्रक्रिया अतिशय जबाबदारीने यशस्वीरित्या पार पाडली.

निवडणुक मतदान प्रक्रिये दरम्यान माओवादयांनी घातपाताच्या उद्‌देशाने ठिकठिकाणी भुसुरूंग पेरून ठेवले होते. दिनांक १०/०४/२०१९ रोजी पोमकें गट्टा (जां) हद्‌दीतील वाटेली बुथ येथे पोलीस पार्टी जात असतांना दुपारी १५.२० वा. सुमारास भुसुरूंग चा स्फोट होउन सिआरपीएफ चे सबइन्सपेक्टर सुनिल कुमार पटेल, पोलीस कॉन्स्टेबल राजीव कुमार रंजन हे किरकोळ जखमी झाले होते. तसेच दिनांक ११/०४/२०१९ रोजी उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोमकें गट्टा (जां.) हद्‌दीतील मौजा परसलगोंदी गावाजवळ दुपारी १५.२० वा. दरम्यान मतदान प्रक्रिया पुर्ण करून परत येत असलेल्या पोलीस पथकावर माओवादयांकडून भुसुरूंग चा स्फोट घडवुन आणला. त्यात गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील नापोशि/२७७९ भिमराव दब्बा, नापोशि/५०३८ हरिदास कुळेटी हे ०२ जवान जखमी झाले आहे.

वरील सर्व जखमींवर नागपूर येथे वैद्यकिय उपचार सुरू असुन सर्व जखमी जवानांची प्रकृती स्थिर आहे. या चारही जवानांच्या कामगिरीबद्‌दल मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री. सुबोधकुमार जायसवाल यांनी कौतुक करून सदर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रोख स्वरूपात बक्षीस दिले आहे.